| | |
|---|---|
| MHKO050012112010 | **नियमित दिवाणी दावा क्र.२२५/२०१० मधील निशाण ९१ वरील आदेश** |

**१.** वादीने सदरचा अर्ज दाव्यामधून प्रतिवादी नं.३ ते ६ यांना कमी करुन मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. वादीने असे कथन केले आहे की, सदरचा दावा हा प्रतिवादी यांचे विरोधात कायम मनाईसाठी, कब्जासाठी व हक्कज्ञापनासाठी दाखल केला आहे. प्रस्तुत दावेमध्ये प्रतिवादी म्हणून दावा गट जमिनीच्या चारी बाजूस असलेल्या मिळकत धारकास व दावा गट जमीनीमधील सहहिस्सेदारास ७/१२ पत्रकी कब्जे वहिवाटीसदरी  नावाची नोंद असल्याने अत्यावश्यक पक्षकार म्हणून सामील केले आहे. परंतू दावा गट जमीनीमधील सहहिस्सेदार व दावा गट जमीन ६५९ लगतचे हिस्सेदार याचे दरम्यान दि.२५/०१/२०१२ रोजी नोंदणीकृत वाटणीपत्र नंबर ९२७/२०१२ झालेबाबत यातील वादी यांना नुकतेच समजून आले असून सदर नोंदणीकृत वाटणीपत्रानुसार दावा गट जमीनीत असलेले हिस्सेदार प्रतिवादी नं.३ ते ६ यांना सामील केले आहे.

**२.** वादी पुढे असे कथन करतात की,  सदरचा दावा दाखल करतेवेळी दावा गट जमिन ६५९ च्या आठ आणे हिस्सेच्या मालकी कब्जा वहिवाटीसदरी प्रतिवादी नं.२ यांचे नावाची नोंद आहे व दावा गट जमिनीच्या उत्तर बाजूस असलेल्या गट नं.६५८ च्या मालक कब्जेवहिवाट सदरी प्रतिवादी नं. २ ते ६ यांच्या नावाची नोंद मालक व कब्जेवहिवाटदार सदरी होती मात्र सदरहु नोंदणीकृत वाटणीपत्र दस्त नं.९२७/२०१२ नुसार दावा गट

जमिनी ६५९ मधील आठ आणे हिस्सेचे क्षेत्र व गट नं.६५८ चे संपूर्ण क्षेत्र यातील प्रतिवादी नं.२ सुभाष बंडू सुतार यांचे एकमेव स्वतंत्र मालकी कब्जा वहिवाटीत देणेत आलेली आहे. त्यामुळे दावा गट जमीन व गट नं.६५८ मध्ये असलेल्या मालकी कब्जा वहिवाटीशी यातील प्रतिवादी नं. ३ ते ६ यांचा कोणताही काडीमात्र संबंध आता अस्तित्वात राहिलेला नाही. त्यामुळे वादी यांनी प्रस्तुत दावेतून प्रतिवादी नं. ३ ते ६ यांना कमी करण्याची विनंती वादी यांनी केली आहे.

**३.** प्रतिवादी यांनी सदर अर्जास नि.९४ कडे म्हणणे दाखल केले आहे. प्रतिवादीने असे कथन केले आहे की, वादीचा अर्ज खरा व बरोबर नाही. वादी यांनी अप्रामाणिक हेतूने खोटा अर्ज दिला आहे. त्यामुळे वादी यांचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती प्रतिवादी यांनी केली आहे.

**४.** प्रस्तुत दाव्याचे अवलोकन केले असता सदरचा दावा हा मनाईसाठी, कब्जासाठी व हक्कज्ञापनासाठी दाखल केल्याचे दिसून येते. वादी यांनी प्रस्तुत दाव्यात दावा मिळकतीमध्ये सहहिस्सेदार व दावा गट जमीन ६५९ लगतचे हिस्सेदार म्हणून प्रतिवादी नं.३ ते ६ यांना सामील केले आहे. परंतु दावा गट जमीनीमधील सहहिस्सेदार व दावा गट जमीन ६५९ लगतचे हिस्सेदार याचे दरम्यान दि.२५/०१/२०१२ रोजी नोंदणीकृत वाटणीपत्र नंबर ९२७/२०१२ झाले आहे. सदरचे वाटणीपत्र वादीने याकामी नि.९३ सोबत हजर केले आहे. त्यामुळे दावा गट जमीन व गट नं.६५८ मध्ये असलेल्या मालकी कब्जा वहिवाटीशी यातील प्रतिवादी नं.३ ते ६ यांचा कोणताही संबंध राहिलेला नसल्याचे वादीचे कथन आहे. वादी यांना प्रतिवादी नं. ३ ते ६ यांच्या विरुध्द कोणतीही दाद मागणेची नाही. तसेच

त्यांच्या विरुध्द दावा चालवण्याचे कोणतेही कारण देखील राहिलेले नाही. त्यामुळे प्रतिवादी नं.३ ते ६ यांना दाव्यातून कमी करणे योग्य होईल. सदरची मागणी ही तांत्रीक स्वरुपाची असून सदरची दुरुस्ती केल्यामुळे दाव्याच्या स्वरुपात कोणताही अमूलाग्र बदल होणार नाही. सदर दुरुस्तीमुळे प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. सदर प्रतिवादी यांना कमी केल्याने दाव्याच्या गुणदोषावर कोणताही परिणाम होणार नाही. तसेच दावा अंतिमरित्या चालवून निकाली होणेसाठी प्रतिवादी नं.३ ते ६ हे आवश्यक पक्षकार नाहीत. त्यामुळे प्रतिवादी नं.३ ते ६ यांना दाव्यातून कमी करण्याची परवानगी वादीला देणे उचित ठरेल. म्हणून खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

**आदेश**

१. वादीचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादीने १४ दिवसांच्या आत दाव्यातून प्रतिवादी नं.३ ते ६ यांना कमी करुन तशी दाव्यात दुरुस्ती करावी.

दिनांक–२७/१०/२०२१

सही/–
(सागर एस.जाधव)
५ वे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
इचलकरंजी.